पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि.५/७/२०१९

पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र. ४ (पुरवणी)

जुलै २०१९

बुधवार, दि.१०/७/२०१९ रोजी दुपारी ०३:०० ( तीन ) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावांच्या सूचना (नोटीसा) मा.सभासदांकडून आलेल्या आहेत.

:– मा. सभासदांचे प्रस्ताव –:

विषय क्र. १४५

संदर्भ :– मा.डॉ. सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर यांची सूचना दि.२/७/२०१९

––––

महाराष्ट्रामध्ये पाऊस सुरु झाल्या नंतर अनेक ठिकाणी दरड कोसळणे, धोकादायक इमारती पडणे, सिमाभिंत पडणे अशा दुर्घटना घडलेल्या आहेत. त्यामध्ये २१ बांधकाम कामगार मृत्युमुखी पडलेले आहेत. कोंढवा व आंबेगाव येथे १५ व ६ कामगार मृत्युमुखी पडलेले आहे. हे बांधकाम कामगार परराज्यातून व परजिल्ह्यातून पुण्यामध्ये बांधकाम व्यवसायाकडे बांधकाम मजुर म्हणून कामाला येत असतात. जे छोटे बांधकाम व्यवसायिक आहेत ते धोकादायक स्थितीमध्ये या बांधकाम मजुराची राहाण्याची व्यवस्था करीत असतात तेथे बांधकाम कामगाराच्या सुरक्षिततेचे कोणतेही उपाय केलेले दिसत नाही. तसेच राज्य शासनाने या बांधकाम कामगाराच्या कुटुंब कल्याणाकरीता कामगार कल्याण मंडळ स्थापन केले आहे. ज्यामध्ये राज्य शासनाकडून या मंडळाकडे जवळ जवळ रु. १८ हजार कोटी जमा आहे. या निधीचा विनियोग या बांधकाम कामगाराच्या एकंदरीत सर्व प्रकाराच्या कल्याणकारी योजना राबविण्याकरीता केला गेला पाहिजे.

परंतु तसे होताना दिसत नाही. कारण या कामगारांची नोंदणी झालेली नसते. हे बांधकाम कामगार प्रत्येक वेळेस जागा बदल करीत असतात. बांधकाम नियमावली मध्ये पुणे महानगरपालिकेस राज्य शासनाकडे प्राप्त झालेली त्यामध्ये छोटे बांधकाम व्यवसायिक यांच्या करीता बांधकाम कामगाराच्या रहाणे योग्य लेबरकॅम्प याचा कोठेही उल्लेख नियमावली मध्ये आढळून येत नाही.

तरी या ठरावाद्वारे पुणे महानगरपालिका राज्य शासनाकडे विनंती करीत आहे. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत चालु असलेले छोटे बांधकाम व्यवसायिक लेबरकॅम्प राज्य शासनाने कामगार कायदा मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधी मधून शासकीय जागेवर लेबरकॅम्प बांधून ते भाडे तत्वाने या बांधकाम कामगारांना देण्यात यावे. जेणे करुन त्यांच्या जीवाला कोणताही धोका होणार नाही व छोट्या बांधकाम व्यवसायाकडून या कामगारांची जाण्या – येण्याची व इतर व्यवस्था करावी.

विषय क्र.१४६

संदर्भ – मा.सौ.अल्पना गणेश वरपे व मा.किरण दगडे पाटील यांची सूचना दि.४/७/२०१९

१) मा.सौ.अल्पना गणेश वरपे, मा.दिलीप वेडेपाटील व मा.किरण दगडे पाटील यांचे दि.२८/०८/२०१८ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८९ दि.१४/९/२०१८
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५०५, दि.३०/१०/२०१८

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेवून –

सर्व्हे नं. ९७, उजवी भुसारी कॉलनी येथील सावरकर मैदानावर असलेले महानगरपालिकेचा हॉल हा संवगडी ज्येष्ठ नागरिक संघ यांस चालविण्याकरीता रितसर करारनामा करून भाडेतत्वावर देण्यात आला होता. सदर जागेचा भाडेपट्टा संपला असून सदर संस्थेस पुढील ५ वर्षासाठी भाडेतत्वावर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.८९५, दिनांक २७/११/२०१८ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा

संदर्भ – १) मा.सौ.अल्पना गणेश वरपे, मा.दिलीप वेडेपाटील व मा.किरण दगडे पाटील यांचे दि.२८/०८/२०१८ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८९ दि.१४/९/२०१८
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५०५, दि.३०/१०/२०१८

----

सर्व्हे नं. ९७, उजवी भुसारी कॉलनी येथील सावरकर मैदानावर असलेले महानगरपालिकेचा हॉल हा सवंगडी ज्येष्ठ नागरिक संघ यांस रितसर करारनामा करुन सदर संस्थेस संयुक्त प्रकल्पासाठी देखभाल व व्यवस्थापनासाठी विनामोबदला ५ वर्षे चालविण्याकरिता देण्यात आलेला होता.

तरी सदर जागेच्या करारनाम्याची मुदत संपली असल्याने व सदर भागातील नागरिकांच्या मागणीनुसार व जागा वाटप नियमावली २००८ नुसार संयुक्त प्रकल्पातील भाग १० अनुक्रमांक १ नुसार या हॉलचे क्षेत्रफळ १५०० चौ. फु. पेक्षा कमी आहे म्हणून पुणे मनपा व ' सवंगडी ज्येष्ठ नागरिक संघ ' यांस वापरण्यास देण्यास मान्यता देणेस व नियमानुसार संयुक्त प्रकल्प म्हणून करारनामा करण्यास व स्वामित्वापोटी वार्षिक १ रुपया नाममात्र भाडे भरण्यास, करारनाम्यात किमान ५ वर्षाची मुदत नमूद करण्यास, करारनाम्यातील पुर्वीच्या अटी व शर्तीचे संस्थांनी काटेकोरपणाने पालन करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्र.१४७**

माहे मे २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधी मध्ये रजा मिळणेबाबत मा. सौ. लता धायरकर यांचे दि.४/७/२०१९ चे पत्र.

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दि. ५/७/२०१९**

**सुनिल पारखी,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची डॉकेटस मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत)**